This Booklet contains 20 printed pages.
इस पुस्तिका में 20 मुद्रित पृष्ठ हैं।

**AK14I**

**Test Booklet No.**
परीक्षा पुस्तिका संख्या

# PAPER—I / प्रश्न-पत्र—I

## MARATHI LANGUAGE SUPPLEMENT / मराठी भाषा परिशिष्ट

### PART—IV & V / भाग—IV & V

**Test Booklet Code**
परीक्षा पुस्तिका संकेत

**K**

Do not open this Test Booklet until you are asked to do so.
इस परीक्षा पुस्तिका को तब तक न खोलें जब तक कहा न जाए।

Read carefully the Instructions on the Back Cover (Pages 19 & 20) of this Test Booklet.
इस परीक्षा पुस्तिका के पिछले आवरण (पृष्ठ 19 व 20) पर दिए गए निर्देशों को ध्यान से पढ़ें।

**For Instructions in Marathi see Page 2 of this Booklet.**
मराठी में निर्देशों के लिए इस पुस्तिका का पृष्ठ 2 देखें।

### *Instructions for Candidates :*

1. This booklet is a supplement to the Main Test Booklet for those candidates who wish to answer **EITHER** Part—IV (Language—I) **OR** Part—V (Language—II), in **MARATHI** language, but **NOT BOTH**.
2. Candidates are required to answer Parts—I, II, III from the Main Test Booklet and Parts—IV and V from the languages chosen by them.
3. Questions on English and Hindi languages for Part—IV and Part—V have been given in the Main Test Booklet. Language Supplements can be asked for separately.
4. Use **Blue/Black Ballpoint Pen only** for writing particulars on this page/marking responses in the Answer Sheet.
5. The CODE for this Language Booklet is **K**. Make sure that the CODE printed on **Side-2** of the Answer Sheet and on your Main Test Booklet is the same as that on this Language Supplement Booklet. In case of discrepancy, the candidate should immediately report the matter to the Invigilator for replacement of the Language Supplement Test Booklet.
6. This Test Booklet has **Two** Parts—IV and V, consisting of **60** Objective-type Questions and each carrying 1 mark :
   Part-IV : Language-I (Marathi) (Q. Nos. 91-120)
   Part-V : Language-II (Marathi) (Q. Nos. 121-150)
7. Part-IV contains 30 questions for Language-I and Part-V contains 30 questions for Language-II. In this Test Booklet, only questions pertaining to Marathi Language have been given. **In case the language(s) you have opted for as Language-I and/or Language-II is a language other than Marathi, please ask for a Test Booklet that contains questions on that Language. The languages being answered must tally with the languages opted for in your Application Form.**
8. **Candidates are required to attempt questions in Part-V (Language-II) in a language other than the one chosen as Language-I (in Part-IV) from the list of languages.**
9. Rough work should be done only in the space provided in the Test Booklet for the same.
10. The answers are to be recorded on the OMR Answer Sheet only. Mark your responses carefully. No whitener is allowed for changing answers.

### *परीक्षार्थियों के लिए निर्देश :*

1. यह पुस्तिका मुख्य परीक्षा पुस्तिका की एक परिशिष्ट है, उन परीक्षार्थियों के लिए जो या तो भाग—IV (भाषा—I) या भाग—V (भाषा—II) मराठी भाषा में देना चाहते हैं, लेकिन दोनों नहीं।
2. परीक्षार्थी भाग—I, II, III के उत्तर मुख्य परीक्षा पुस्तिका से दें और भाग—IV व V के उत्तर उनके द्वारा चुनी भाषाओं से।
3. अंग्रेज़ी व हिन्दी भाषा पर प्रश्न मुख्य परीक्षा पुस्तिका में भाग—IV व भाग—V के अन्तर्गत दिए गए हैं। भाषा परिशिष्टों को आप अलग से माँग सकते हैं।
4. इस पृष्ठ पर विवरण अंकित करने एवं उत्तर-पत्र पर निशान लगाने के लिए **केवल नीले/काले बॉलपॉइंट पेन** का प्रयोग करें।
5. इस भाषा पुस्तिका का संकेत **K** है। यह सुनिश्चित कर लें कि इस भाषा परिशिष्ट पुस्तिका का संकेत, उत्तर-पत्र के **पृष्ठ-2** एवं मुख्य परीक्षा पुस्तिका पर छपे संकेत से मिलता है। अगर यह भिन्न हो, तो परीक्षार्थी दूसरी भाषा परिशिष्ट परीक्षा पुस्तिका लेने के लिए निरीक्षक को तुरन्त अवगत कराएँ।
6. इस परीक्षा पुस्तिका में दो भाग—IV और V हैं, जिनमें **60** वस्तुनिष्ठ प्रश्न हैं तथा प्रत्येक 1 अंक का है :
   भाग—IV : भाषा—I (मराठी) (प्रश्न सं० 91-120)
   भाग—V : भाषा—II (मराठी) (प्रश्न सं० 121-150)
7. भाग—IV में भाषा—I के लिए 30 प्रश्न और भाग—V में भाषा—II के लिए 30 प्रश्न दिए गए हैं। इस परीक्षा पुस्तिका में केवल मराठी भाषा से सम्बन्धित प्रश्न दिए गए हैं। **यदि भाषा—I और/या भाषा—II में आपके द्वारा चुनी गई भाषा(एँ) मराठी के अलावा है/हैं, तो कृपया उस भाषा वाली परीक्षा पुस्तिका माँग लें। जिन भाषाओं के प्रश्नों के उत्तर आप दे रहे हैं वह आवेदन पत्र में चुनी गई भाषाओं से अवश्य मेल खानी चाहिए।**
8. **परीक्षार्थी भाग—V (भाषा—II) के लिए, भाषा सूची से ऐसी भाषा चुनें जो उनके द्वारा भाषा—I (भाग—IV) में चुनी गई भाषा से भिन्न हो।**
9. रफ़ कार्य परीक्षा पुस्तिका में इस प्रयोजन के लिए दी गई खाली जगह पर ही करें।
10. सभी उत्तर केवल OMR उत्तर-पत्र पर ही अंकित करें। अपने उत्तर ध्यानपूर्वक अंकित करें। उत्तर बदलने हेतु श्वेत रंजक का प्रयोग निषिद्ध है।

Name of the Candidate (in Capitals) : ____________________
परीक्षार्थी का नाम (बड़े अक्षरों में)

Roll Number (in figures) : ____________________
अनुक्रमांक (अंकों में)

(in words) : ____________________
(शब्दों में)

Centre of Examination (in Capitals) : ____________________
परीक्षा-केन्द्र (बड़े अक्षरों में)

Candidate's Signature : ____________________
परीक्षार्थी के हस्ताक्षर

Invigilator's Signature : ____________________
निरीक्षक के हस्ताक्षर

Facsimile signature stamp of Centre Superintendent ____________________

**11-I**

ही पुस्तिका 20 प्रष्ठ आहे.

# AK14I

चाचणी पुस्तिका कोड

**K**

## प्रश्नपत्रिका—I

## मराठी भाषा पुरवणी

## भाग—IV & V

ही पुस्तिका उघडायला सांगेपर्यंत ती उघडू नका.

या पुस्तिकेच्या मलपृष्ठावरील (19 आणि 20) सूचना काळजीपूर्वक वाचा.

*परीक्षार्थींसाठी सूचना :*

1. ही पुस्तिका मुख्य चाचणी पुस्तिकेची पुरवणी असून ती अशा परीक्षार्थींकरिता आहे, की जे **मराठी** भाषेतील भाग—IV (भाषा—I) **किंवा** भाग—V (भाषा—II) **यांपैकी एकाची** उत्तरे लिहू इच्छितात, **दोन्हींची नव्हे.**
2. परीक्षार्थींनी मुख्य चाचणी पुस्तिकेतील भाग—I, II, III सोडवायचा आहे आणि त्यांनी निवडलेल्या भाषेतील भाग—IV आणि V सोडवायचा आहे.
3. भाग—IV आणि V यांमधील इंग्लिश आणि हिन्दी भाषांवरील प्रश्न मुख्य चाचणी पुस्तिकेत दिलेले आहेत. पुरवण्या स्वतंत्रपणे मागून घेता येतील.
4. या पृष्ठावर माहिती लिहिण्यासाठी/प्रतिक्रिया नोंदवण्यासाठी **केवळ निळे/काळे बॉल पॉइंट पेनच** वापरा.
5. या भाषा पुस्तिकेचे **कोड K** आहे. उत्तर पत्रिकेच्या **बाजू-2** वर छापलेले कोड आणि या भाषा पुरवणी पुस्तिकेवरील कोड एकच आहे, याची खात्री करून घ्या. जर काही विसंगती असेल तर, परीक्षार्थीने ती ताबडतोब पर्यवेक्षकास दाखवावी आणि भाषा पुरवणी पुस्तिका बदलून मागावी.
6. या चाचणी पुस्तिकेत IV आणि V असे **दोन** भाग आहेत. त्यांमध्ये **60** वस्तुनिष्ठ पद्धतीचे प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास एक गुण आहे :

   भाग—IV : भाषा—I (मराठी) (प्र. सं. 91 ते 120)

   भाग—V : भाषा—II (मराठी) (प्र. सं. 121 ते 150)
7. भाग—IV मध्ये भाषा—I साठी 30 प्रश्न आहेत आणि भाग—V मध्ये भाषा—II साठी 30 प्रश्न आहेत. या चाचणी पुस्तिकेत केवळ मराठी भाषेशी संबंधित प्रश्न दिलेले आहेत. **जर तुम्ही भाषा—I व/वा भाषा—II साठी निवडलेली भाषा मराठी पेक्षा वेगळी असेल, तर कृपया त्या भाषेवरील प्रश्न असलेल्या चाचणी पुस्तिकेची मागणी करा. ज्या भाषेची उत्तरे तुम्ही लिहीत आहात ती भाषा आणि तुमच्या अर्जामध्ये निवडलेली भाषा या एकच असल्या पाहिजेत.**
8. **भाग—V (भाषा—II) याकरिता असलेली भाषा ही भाषांच्या यादीमधील निवडलेली भाषा—I (IV भागातील) पेक्षा निराळी असली पाहिजे.**
9. चाचणी पुस्तिकेमध्ये कच्चा आराखडा करण्यासाठी नेमून दिलेल्या जागेतच तो करावा.
10. OMR उत्तर पृष्ठावरच उत्तरे नोंदवायची आहेत. तुमच्या प्रतिक्रिया काळजीपूर्वक नोंदवा. उत्तरात बदल करण्यासाठी पांढरा रंग (whitener) वापरण्याची परवानगी नाही.

परीक्षार्थीचे नाव : ____________________

अनुक्रमांक (अंकांमध्ये) : ____________________

(शब्दांमध्ये) : ____________________

परीक्षाकेंद्र : ____________________

परीक्षार्थीची सही : ____________________ पर्यवेक्षकाची सही : ____________________

Facsimile signature stamp of Centre Superintendent ____________________

भाषा—I चा विकल्प मराठी निवडला असणाऱ्या परिक्षार्थींनेच केवळ खालील प्रश्नांची उत्तरे द्यावीत.

# भाग—IV : भाषा—I

## मराठी

*सूचना* : पुढील कविता वाचा आणि विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे योग्य तो पर्याय निवडून लिहा (प्र० क्र० **91** ते **96**) ।

जमाखर्च स्वातंत्र्याचा मांडणार केव्हा?
जाब उंच प्रासादांचा मागणार केव्हा?

धूर्त शोषकांच्या ओठीं घोष संस्कृतीचा :
चूड इथे या ढोंगाला लागणार केव्हा?

जाहिरात आई ज्यांची, जाहिरात बाप :
आत्मविक्रयाचे झेंडे फाडणार केव्हा?

विलायती वेषांमधली भुंकतात कुत्री :
माणसास माणुस येथे मानणार केव्हा?

घाम ओतूनी जो पिकवी मळे अमृताचे
दिवा झोपडीतून त्याच्या लागणार केव्हा?

प्राक्तनात अस्पृश्याच्या छळाचीच गाथा :
आग आंधळया धर्माला लावणार केव्हा?

इथे पडे सत्तेभवती कडे भ्रष्टतेचे :
काजळी दिव्याभवतीची झाडणार केव्हा?

किती काळ बघत बसावे फुगे घोषणांचे?
भास हे भ्रमाचे सारे फोडणार केव्हा?

**91.** झोपडीत दिवे न लागण्याचा कवीला राग का आहे?

(1) कष्टक-यांना त्यांच्या कामाचा मोबदला मिळत नसल्याने

(2) भ्रष्ट व्यवस्थेने सर्वांच्या आयुष्यात अंधार आणल्याने

(3) वीजेचा प्रवाह झोपडीत पोहचला नसल्याने

(4) श्रीमंतांनी त्यांच्या नावाचा प्रकाश स्वःताच वापरल्याने

**92.** दिव्या भोवती काय असते?

(1) तेल

(2) काजळी

(3) अंधार

(4) उजेड

**93.** कवीचा आक्रोश कोणाविरूध्द आहे?

(1) यंत्रणेविरूध्द

(2) राजकीय नेत्यांविरूध्द

(3) स्वातंत्र्याविरूध्द

(4) उजेडाविरूध्द

**94.** आग आंधळया धर्माला लावणार केव्हा? या ओळीतून कवीला काय सूचवायचे आहे.

(1) कवीला धर्मातील स्पृशास्पृशतेला विरोध आहे

(2) कवीला आंधळयांना धर्माची शिकवण दयायची

(3) कवीला धर्मातील अंधश्रध्दा दूर करायच्या आहेत

(4) कवीला सर्व धर्मग्रंथांना आग लावयची आहे

**95.** खालिलपैकी कोणते विशेषण चुकीचे आहे?

(1) अमृताचे-मळे

(2) फुगे-घोषणांचे

(3) अंधार-मशालीचे

(4) धूर्त-शोषक

**96.** कवितेला कोणते शिर्षक समर्पक ठरेल?

(1) जमाखर्च स्वातंत्र्याचा

(2) धूर्त-शोषक

(3) शोषक स्वातंत्र्याचे

(4) अंधार स्वातंत्र्याचा

सूचना : सर्वात योग्य विकल्प निवडा (प्र० क्र० **97** ते **111**) :

**97.** उताऱ्यामधून काढलेल्या काही शब्दांचे वाचन केल्यानंतर रिकाम्या जागा भरतांना विद्यार्थ्यांच्या कोणत्या क्षमतेची कसोटी लागते?

(1) नवीन शब्दांचा वापर

(2) गोषवारा

(3) शब्दांचे अर्थ

(4) आकलन

**98.** खालीलपैकी वाचून आकलन होणारा प्रश्न कोणता?

(1) नोबेल पुरस्कार मिळविणारे भारतीय कवी कोण?

(2) किरण देसाई यांचे नवीन पुस्तक तुम्ही वाचले काय?

(3) स्वतःचे वाक्यात लागू शब्द वापरा

(4) 'हॉटेल' या शब्दांचा उच्चार तपासा

**99.** बालकांना अर्थपूर्ण लिखाण शिकविण्यापूर्वी त्याच्या अंगी —— कौशल्य निर्माण व्हावे यासाठी त्याला रंगकांडयांनी रेखाटन काढणे, वर्तुळ किंवा अन्य आकार काढण्यासाठी प्रेरित करणे गरजेचे आहे.

(1) भावनात्मक

(2) संरक्षणात्मक

(3) आकलनात्मक

(4) प्रेरणात्मक

**100.** सहज पत्र लिखाणासाठी विद्यार्थ्याने या महत्त्वाच्या गोष्टींकडे लक्ष देणे गरजेचे असते

(1) स्पष्टवक्तेपणा, संक्षिप्त संबोधनांचा वापर, योग्य प्रारूप

(2) व्यक्तिगत, कुठल्याही प्रारूपा शिवाय

(3) काही संदर्भ, आपुलकीचे शब्द, संक्षिप्त संबोधने

(4) थोडे व्यक्तिनिरपेक्ष, अचूक प्रारुपाचा वापर

**101.** सर्वमान्य भाषिक नियमाअभावी भाषा शिकणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये विशिष्ट शब्दांचा उच्चार करताना येणारा न्यूनगंड निर्माण होतो. तो दूर करण्यासाठी कोणता मार्ग सूचविता येईल?

(1) वर्ग खोलीत भाषिक संवादावर आधारित खेळ घडवून आणणे

(2) समुपदेशकाचे भाषिक कौशल्यावरील विशेष मार्गदर्शनाचे आयोजन करणे

(3) चूका होतात तेव्हा वेळीच त्या दूरुस्त करणे

(4) वर्गात विद्यार्थ्यांचे जोरात वाचन घेणे

**102.** मी आजच्या पाठासाठी एक गाणे निवडले आहे. विद्यार्थ्यांनी गाणे ऐकूण भरावयाच्या रिक्त स्थानी शब्दांचा अंदाज लावावा. त्यानंतर त्यांनी गाणे ऐकूण-चूक कींवा बरोबर तपासून घ्यावे. ही माहिती एक —— उपक्रम आहे.

(1) दुरुस्तीचा

(2) जागा भरण्याचा

(3) हस्तांतरणाचा

(4) आदान-प्रदानाचा

103. कालावधी ज्यात मुल इतरांपेक्षा लवकर भाषा आकलन करतात

(1) पहिल्या 8 वर्षात

(2) पहिल्या 8 वर्षानंतर

(3) पहिल्या 10 वर्षात

(4) पहिल्या 13 वर्षानंतर

104. खालीलपैकी प्रभावी माध्यम ओळखा : ज्याद्वारे विद्यार्थ्यांसाठी कमी खर्चात जास्त आशय सहज उपलब्ध होऊन ज्ञानाची कक्षा रुंदावते

(1) इलेक्ट्रॉनिक्स मेडीया (दृकश्राव्य माध्यम)

(2) चित्रप्रदर्शनी/प्रात्यक्षिक

(3) प्रोजेक्टरवरील चित्र प्रदर्शन/स्लाईड शो

(4) वर्तमानपत्र

105. बहुभाषिक विद्यार्थ्यांच्या वर्गामध्ये विद्यार्थी एकच भाषा शिकत असल्यास

(1) समान भाषा बोलण्याऱ्या विद्यार्थ्यांचा गट निर्माण करुन संवाद साधला तर त्याला भाषा अवगत होईल

(2) उद्दिष्टीत (इंग्रजी) भाषेला चालणां देण्याचा उद्देश ठेवून अन्य भाषेतील संवादाला हेतू पुरस्सर डावलणे

(3) संवाद कौशल्या अभावी विद्यार्थ्याला भाषांतर कंटाळवाणे होईल

(4) उद्दिष्टीत (इंग्रजी) भाषिक उच्चार, व्याकरणीय रचना समजून घेण्यासाठी त्याला चर्चेची संधी उपलब्ध करुन देणे

106. दुसऱ्या किंवा विदेशी (इंग्रजी) भाषेत प्राविण्य मिळविण्याच्या प्रयत्नात भाषिक संवहनावर विपरित परिणाम होऊ नये. यासाठी शिक्षकांना खालील पैकी काय मदतीचे ठरेल.

(1) विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी सांघिक कार्य वाटप करुन त्यांच्यात चर्चा घडविणे

(2) अन्य भाषा शिकण्यातील अडचणी दूर करण्यासाठी नियमित कालावधीच्या निदान विषयक चाचण्यांचे आयोजन करणे

(3) कठीण उताऱ्यांच्या मोठ्या प्रमाणात वाचन सत्रांचे आयोजन करणे

(4) प्रथम भाषा आत्मसात करताना वापरलेल्या समान भाषा कौशल्याचाच दुसरी (इंग्रजी) भाषा आकलन करताना प्रभावी वापर करणे

107. विविधांगी क्षमताधारक विद्यार्थी असणाऱ्या भाषेच्या वर्गामध्ये शिक्षकांनी कोणत्या बाबींची खात्री करुन घेणे आवश्यक ठरते ...?

(1) गृहपाठ पूर्ण करुन आणण्यासाठी शिक्षक व पालकांच्या नियमित बैठकी घेणे

(2) वर्गामध्ये छोटया प्रकल्पाद्वारे चर्चा घडविणे, त्यांच्यात सामाजिक कौशल्य निर्माण करणे, नंतर मोठया सांघिक उपक्रमात सहभागी करणे

(3) शाळासुटल्यानंतर विशेष वर्ग घेऊन त्यांचे गुण वाढीचा प्रयत्न करणे

(4) मानसोपचार तज्ज्ञांसोबत ठराविक कालावधीनंतर शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या समस्या सोडविण्यास्तव बैठकी घेणे

108. पुस्तकातील प्रश्न अनेक वेळा निम्न अभिरुचीचे किंवा वस्तुनिष्ठ पातळीवरचे असतात. अशावेळी शिक्षक काय करु शकतो?

(1) पुस्तकातील उताऱ्याकडे दुर्लक्ष करु शकतो

(2) अधिक साहित्य वाचनाचे आदेश देवू शकतो

(3) कल्पक विचारशैली निर्माण करणारा व त्याद्वारे संबंधित अडचण सोडविणारा उपक्रम राबवू शकतो

(4) त्या विशिष्ट ज्ञानावर आधारीत पाठ तयार करु शकतो

**109.** शब्दार्थ न समजल्याने विदेशी (इंग्रजी) भाषा शिकणाऱ्या मुलांना लेखी मजकूर समजून घेताना अडचणी येतात. ही समस्या अशाप्रकारे सोडविली जाऊ शकते.

(1) शब्दांचे वर्ण व उच्चार जोरात उच्चारुन

(2) शब्द वाचतांना अचूक शब्दोच्चार ऐकूण आणि प्रयत्नपूर्वक त्याचा पुनरुच्चार करुन

(3) शिक्षकांच्या उच्चाराला दुर्लक्षित करुन

(4) समस्या असणाऱ्या शब्दांचे स्वतःच प्रयत्नपूर्वक वाचन करुन

**110.** भाषेच्या वर्गातील विशेष क्षमता असणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, यश आणि स्वअध्ययन प्रवृत्ती वृध्दींगत करण्यासाठी कसे प्रोत्साहन द्याल?

(1) विद्यार्थ्यांची सर्वसमावेशी समस्या लक्षात घेऊन विद्याविभूषित शिक्षकांची नेमणूक करुन

(2) शाळेतील कमी हुशार मुलांमध्ये त्यांना मिसळण्यास मज्जाव करुन

(3) विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या क्रमीक अभ्यासक्रमांची पुस्तके उपलब्ध करुन

(4) सहअध्ययन, परस्पर सहकार्य आणि चर्चेला प्रोत्साहन देऊन

**111.** पारंपारिक भाषेचा वर्ग हा शिक्षक केंद्रीत आहे. आधुनिक वर्ग हा विद्यार्थी केंद्रीत आहे. खालीलपैकी कोणते एक वाक्य वरिल विधानांशी विसंगत वाटते

(1) विद्यार्थी स्वतः भाषा शिकण्याचे शास्त्र विकसित करून सहभागी होतात. शिक्षकांना आपलेसे करून त्यांना सुविधा उपलब्ध करून देतात

(2) शिक्षक हे भाषा उच्चार व लिखानासाठी सर्वकालीक विद्यार्थ्यांसाठी आदर्श असतात व विद्यार्थ्यावर कायम त्यांची छाया असते

(3) शिक्षक हे शिक्षणाचे प्रभारी असून विद्यार्थ्यांना त्यांच्या कामगिरीनुरुप प्रतिसाद मिळतो आहे का याची हमी घेतात

(4) विद्यार्थी शाळेच्या बाहेर स्वअध्ययन करतात, आणि नियतकाळाने लेखी चाचण्या देतात

**सूचना :** पुढील उतारा वाचा आणि विचारलेल्या प्रश्नांची योग्य तो पर्याय निवडून उत्तरे लिहा. (प्र० क्र० **112** ते **120**) ...

कारण चंद्रकांतच्या पण अकस्मात बदलीचीही शक्यता होती, त्या राज्यांचे पुरवठामंत्री त्या जिल्ह्याचे रहिवासी होते. आणि तेच शेजारच्या जिल्ह्याचे पालकमंत्री. चंद्रकांत हा अप्पर जिल्हाधिकारी असल्याने रेशन दुकाने, केरोसिन, पेट्रोल व गॅस वितरण आदी कामाच्या संदर्भात पुरवठा मंत्र्यांशी त्याचा नित्य संबंध यायचा. त्यानं घातलेल्या धाडी आणि जीवनावश्यक वस्तू कायद्यांअंतर्गत दिलेले निर्भीड निवाडे यामुळे त्याची प्रतिमा उंचावली होती. त्याच्या कारभाराचा तडाखा बसलेल्यांमध्ये पुरवठामंत्र्यांचे काही नातेवाईक व कार्यकर्तेही होते, सांगूनही तो त्यांचं ऐकत नसल्यामुळे मंत्र्यांचा रोष होताच. तो पुरवठामंत्र्यांच्या जातीचा व नात्यातला होता. त्यामुळे चंद्रकांताची बदली होण्याचा दाट संभव होता. त्याची विकेट केव्हाही पडू शकत होती. त्यानं कितीही उत्तम खेळ केला तरी आऊट करणाऱ्या अंपायरकडे प्रशासनरुपी खेळाची नीतिशास्त्र व नियमपुस्तिका कुठे होती? अंपायरनं बोट वर केलं की त्याला चालतं व्हावं लागणार होतं. क्रिकेटमध्ये निदान खेळाडू अंपायरशी वाद घालतो व बॅट आपटीत रोष प्रकट करतो, तेवढेही स्वातंत्र्य अधिकाऱ्यांना नसते.

चंद्रकांतला या सर्व खेळाची चांगली कल्पना होती. पण तो काही करु शकत नव्हता. मुख्य म्हणजे राजकीय कारणांस्तव मुदतपूर्व बदल्यांची त्याला सवय झाली होती. त्याला त्याचं विशेष दुःखही नव्हतं. खंत एकच राहून राहून वाटायची, आपली जर या आठ-पंधरा दिवसात बदली झाली तर साक्षरता अभियानाचं काय होणार?

अनासक्त कर्मयोगाचा सिद्धान्त चंद्रकांतला मुळीच मान्य नव्हता. जितका वेळ इंथ राहयला मिळेत त्या वेळेचा सदुपयोग करीत अभियानाला गती देत राहून, ते मुदतीपूर्वीच

पूर्ण होईल याकडे लक्ष पुरवायचं त्यानं ठरवलं. तो झपाटून कामाला लागला. त्यांची बदली झाली नाही. येणारा अधिकारी लाचलुचपत प्रतिबंधक खात्याच्या सापळयात प्रत्यक्ष लाच घेताना पकडला गेला आणि निलंबित झाला.

चंद्रकांत अभियान पूर्ण होईपर्यंत तिथंच राहिला. साक्षरता अभियान खरोखरच प्रत्यक्षात यशस्वी झालं होतं. आकड्याची जादूगिरी न करता प्रत्यक्षात काम झाल्यामुळे साक्षरता मिशनच्या कसोटीला हा जिल्हा उतरला, चंद्रकांतला कृतार्थ झाल्यासारखे वाटले. एक महत्वाचं मूलभूत काम आपल्या हातानं पूर्ण झालं याचं समाधान होतं!

त्या जिल्ह्यातील त्याचा कालवधी आता संपला होता. बदलीसाठी तो मनानं सज्ज झाला. पदोन्नतीची खबरही कळली. मात्र मंत्रालयीन सोपस्कार पूर्ण होऊन आदेश मिळण्यास व नव्या ठिकाणी नियुक्ती होण्यास तीन-चार महिने लागणार होते. विभागीय आयुक्तांना भेटून त्यानं विनंती केली की, मला इथं तीन-चार महिने राहू द्यावं. या काळात साक्षरोत्तर कार्यक्रमाचा प्रकल्प आराखडा तयार करुन, त्याला नवी दिल्लीहून मान्यता आणता येईल.

आपलं आजवरचं पुरवठा नियंत्रणाचं काम आणि साक्षरता अभियानातील कल्पकता व जिद्द ध्यानात घेऊन आपली बदली कमिश्नर करणार नाहीत असं त्याला वाटत होतं. त्यांना एक वर्ष त्याच ठिकाणी ठेवायचे अधिकारही असतात.

आयुक्तांना भेटून आल्या नंतर पंधराच दिवसांनी आयुक्तालयात नवनिर्मित उपआयुक्त (करमणूक कर) या पदावर त्यांची बदली करण्यात आली. हे पद यापूर्वी प्रथम तहसीलदार व नंतर उपजिल्हाधिकारी संवर्गातील होते. करमणूक कराची वसुली ही बाब जिल्हा स्तरावची असते. विभागीय पातळीवर केवळ नियंत्रण व दिशादिग्दर्शनाचं काम असतं. थोडक्यात, नाव मोठं लक्षण खोटं असं या पदोन्नत पदाचं स्वरुप होतं.

**112.** चंद्रकांत कोण होता?

(1) निवासी उपजिल्हाधिकारी

(2) साहायक उपजिल्हाधिकारी

(3) अप्पर जिल्हाधिकारी

(4) अतिरिक्त जिल्हाधिकारी

**113.** साक्षरता या शब्दाचा विरूध्दार्थी शब्द कोणता?

(1) अशिक्षित

(2) निरिक्षरता

(3) अक्षरशत्रू

(4) सुशिक्षित

**114.** अधिका-याची प्रतिमा कशामुळे उंचावते?

(1) लोकपयोगी कार्यामुळे

(2) मंत्र्यांनी शाबासकी दिल्यामुळे

(3) वर्तमानपत्रातील प्रसिध्दीमुळे

(4) लोकांमधील चर्चेमुळे

115. प्रकल्पांमध्ये आकाडयांची जादुगीरी करणे म्हणजे काय?

(1) फसव्या आकडयांचा प्रयोग करणे

(2) आकडे वाढवून प्रकल्प मांडणे

(3) प्रकल्पात जादुगराचा समावेश करणे

(4) प्रकल्पात आकडयांचा वेगवेगळा क्रम लावणे

116. चदंकांत यांची बदली कोणत्या पदावर झाली?

(1) अप्पर जिल्हाधिकारी

(2) जिल्हा पुरवठा अधिकारी

(3) जिल्हा साक्षरता अधिकारी

(4) उपायुक्त करमणूक कर

117. चंद्रकांत हा कुठल्या गटात मोडणारा अधिकारी आहे?

(1) प्रसिध्दीचा हव्यास असणारा

(2) कर्तव्यदक्ष असणारा

(3) वरिष्ठांचे लांगूनचालन करणारा

(4) सांगितलेले काम करणारा

118. निर्भिड या शब्दांचा विरूध्दार्थी शब्द कोणता?

(1) साहसी

(2) धाडसी

(3) भित्रा

(4) शूर

119. वेळेचा सदुपयोग करणे —— म्हणजे करणे होय?

(1) टिवल्या-बावल्या करणे

(2) मिळालेल्या वेळेला सत्कर्मी लावणे

(3) वाट पाहण्यात वेळ काढणे

(4) फावल्या वेळात झोपा काढणे

120. चंद्रकांतची विकेट पडणार होती याचा अर्थ काय?

(1) तो मंत्र्यांपुढे नमणार होता

(2) मंत्री त्याला रागवणार होते

(3) तो त्रिफळाचित होणार होता

(4) त्याची बदली होणार होती

**भाषा—II चा विकल्प मराठी निवडला असणाऱ्या परिक्षार्थींनेच केवळ खालील प्रश्नांची उत्तरे द्यावीत.** →

## मराठी

*सूचना* : सर्वात योग्य पर्याय निवडा (प्र० क्र० **121** ते **126**) :

आजकाल जुनं बरंचसं जात चाललं. जे टाकाऊ असेल ते टिकलं नाही, त्याचं काही नव्हे. जीवनाचे कणच जर एखाद्या वस्तूत नसतील तर तिनं जगावं तरी का? पण प्रत्येक बाबतीतच हे काही खरं नव्हे. आता हे शहरातलं जागेच्या टंचाईचंच घ्या. मुंबईत लोक घरात सामावत नाहीत हे ऐकलं होते. आता तर मुंबईला जाणंयेणंच घडत असल्यामुळं तिथली माणसं फूटपाथवर झोपलेलीही प्रत्यक्ष बघायला मिळाली. जागेची ही टंचाई आहे तर तिच्यावर उपायही आलेच. एक मजली घरं आणि साधी कौलारु घरं जाऊन आता दुमजली-तिमजली घरं व्हायला लागली. घरं पुरली नाहीत तेव्हा त्यांवरचे मजले वाढले. हेही ठीकच झालं. खेडं सोडून आम्ही शहरात राहायला आलो तेव्हा आमचं कौलारु पण मोठं घर आमच्यापासून दूर गेलं. आगगाडीच्या डब्यांसारख्या एकाशी एक जोडलेल्या चौकानी खोल्या—, त्याही फार फार तर दोन तीन—आमच्या वाटयाला आल्या. आणि एकेक खोली टिचभर! शहरातच राहायचं तर तेही सहन केलंच पाहिजे. आता मधूनमधून थोडीशी त्या मोठया घराची आठवण होते, पण मनच मनाला समजावू शकतं. जुन्या माणसांनी बांधलेल्या ऐतिहासिक इमारती पाहिल्या म्हणजे आमच्या सध्याच्या चौकोनी खोल्या खुराडयांसारख्या वाटतात. अष्टकोनी, चंद्राकृती, लांबोळ्या, वाटोळ्या तऱ्हेतऱ्हेच्या त्या खोल्या-नव्हे, भव्य दालनं पाहिली म्हणजे वाटून जातं की, त्या मंडळींनाच केवळ राहावं कसं ते माहित होतं. विसाव्या शतकातल्या माणसांचा जन्मच मुळी आठ बाय आठच्या चौकोनात राहण्यासाठी झालेला आहे असं खारटतुरट समाधान करता येतं. ते सारं ठीक आहे. ठीक मानायला हवं. पण मन मानत नाही ते एकाच गोष्टीत. पूर्वीची घरं गेली. जाऊ दे पूर्वीची आंगणं मात्र जायला नकोत. इथं आमच्या मोहोल्ल्यात आंगणंच नाहीत. जर कुठं जागा मोकळी दिसली रे दिसली, की तिथं एखादी रुम तयार होते. कॉलेजच्या नावानं या शहरात आलेली मुलं मग तिथं राहायला येतात. घरमालकांच्या व्यवहारी वृत्तीचं. कित्येकदा मोठं कौतुक वाटतं. जरा म्हणून जागा रिकामी राहू द्यायचे नाहीत. मोकळी जागा तर यांच्या दृष्टीनं निरुपयोगी वस्तू. जागेचा बराचसा भाग आजकाल रस्त्यामध्ये खर्च होतो, याचं त्या महाभागांना फारच वाईट वाटत असलं पाहिजे. मुंबईला जसे काही ठिकाणी अंडरग्राउंड रस्ते आहेत तसे जर घरालाही करता आले तर इकडच्या घरमालकांची खूपच सोय होईल. मग जुन्या रस्त्यांच्या जागी हे लोक पुन्हा खोल्या बांधतील.

**121.** खालीलपैकी कोणती जोडी वेगळी आहे?

(1) शिक्षक—विद्यार्थी

(2) दुकानदार—नोकर

(3) घरमालक—भाडेकरू

(4) शेतमालक—मजूर

**122.** लेखकाला कशाची खंत आहे?

(1) फूटपाथवर माणसं झोपल्याची

(2) मुंबईत जागा नसल्याची

(3) अंडरग्राउंड रस्त्यांची

(4) आंगण नसल्याची

**123.** मुले शहरात कशासाठी येतात?

(1) कॉलेजच्या उच्चशिक्षणासाठी

(2) मुंबई शहर पाहण्यासाठी

(3) भाडयाच्या घरात राहण्यासाठी

(4) आंगण शहरात शोधण्यासाठी

**124.** खुराडा कशाला म्हणतात?

(1) घोडयांची राहण्याची जागा

(2) गाढवांची राहण्याची जागा

(3) बैलांची राहण्याची जागा

(4) कोंबडयांची राहण्याची जागा

**125.** या उता-याला समर्पक शिर्षक कोणते ठरेल?

(1) खुराडा

(2) माणसांची गर्दी

(3) आंगण

(4) विसाव्या शतकातील गर्दी

**126.** कौलारू घर कोणत्या भागात असतात?

(1) पाऊस पडणा-या प्रदेशात

(2) बर्फ पडणा-या प्रदेशात

(3) पठारी प्रदेशात

(4) वाळवंटात

*सूचना* : सर्वात योग्य पर्याय निवडा (प्र० क्र० **127** ते **141**) :

**127.** खालील प्रश्नोत्तराला तुम्ही कसे गुण द्याल?

प्रश्न : वाघ हा लुप्त (नष्टप्राय) प्राणी आहे काय?

उत्तर (1) : नाही, परंतु तो दुर्मिळ प्राणी झाला आहे. (1)

उत्तर (2) : वाघ हा विलूप्त होण्याच्या मार्गावर आहे. (1)

(1) ½ गुण उत्तर क्रमांक 2 ला व 1 गुण उत्तर क्रमांक 1 ला

(2) 1 गुण उत्तर क्रमांक 1 ला व 1 गुण उत्तर क्रमांक 2 ला

(3) 1 गुण उत्तर क्रमांक 2 ला व 0 गुण उत्तर क्रमांक 1 ला

(4) ½ गुण उत्तर क्रमांक 1 ला व 1 गुण उत्तर क्रमांक 2 ला

**128.** उताऱ्याचे आकलन होण्यासाठी वाचनाच्या रणनितीचा उपयोग केल्यास विद्यार्थ्यांना त्या उताऱ्याची उपयुक्तता लक्षात येते. ही रणनिती खाली फैकी कोणती?

(1) भाकीत काढणे

(2) गोषवारा काढणे

(3) वाचन दोष

(4) मुद्यांची नोंद घेणे

**129.** 'उत्तम वाक्याची गुढता' हे, विद्यार्थ्यांनी नाटक लिहीले. चार भूमिकांना केवळ 10 वाक्यात त्यांनी लिहून काढले. प्रत्येक भूमिकेला केवळ एकाच पद्धतीचे वाक्य बोलण्याची ताकीद आहे. हा उपक्रम सराव म्हणून खालीलपैकी कोणत्या उपक्रमासाठी वापरता येऊ शकतो?

(1) वाचनानंतरच्या सरावासाठी

(2) लिखाणापूर्वीच्या सरावासाठी

(3) व्याकरणाच्या सरावासाठी

(4) शब्दसाठा वाढविण्यासाठी

**130.** वर्ग 3 च्या विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशील लिखाणाला चालना देण्यासाठी खालीलपैकी कोणता पर्याय योग्य ठरेल.

(1) चित्रांचा प्रयोग करणे व त्यावर चर्चा करणे

(2) विद्यार्थ्यांना त्यांच्या मर्जीप्रमाणे लिहू देणे

(3) दिलेल्या विषयावर सखोल चर्चा करणे

(4) फळ्यावर रुपरेषा लिहून देणे

**131.** एखाद्या कार्यक्रमात तुमच्या वर्गातील बहुतेक मुले इंग्रजी बोलण्यासाठी लाजत असतील, तर या दुविधावस्तेतून त्यांना काढण्यासाठी तुम्ही काय कराल?

(1) वर्गासमोर सोप्या विषयावर उत्स्फूर्तपणे बोलण्यासाठी सांगणे

(2) त्या मुलांना सर्वांचे बोलणे झाल्यानंतर बोलायची संधी देणे

(3) इंग्रजी बोलण्यासाठी खाजगी शिकवणी देणे

(4) विद्यार्थ्यांना आपसात जोडीने किंवा छोटे गट बनवून त्यांच्या सादरीकरणाची तालीम करायला सांगणे

**132.** श्रवण कौशल्य विकसीत करण्यासाठी शिक्षकाने वर्गात एक उपक्रम राबविला ज्यात रेल्वे स्थानकावरील उदघोषणा ऐकूण, येणाऱ्या आणि जाणाऱ्या रेल्वे गाडयांचे वेळापत्रक (तक्ता) बनवायला सांगितले. या ठिकाणी विद्यार्थी खालीलपैकी कोणती क्रिया करीत आहेत.

(1) ध्वनीफीत ऐकूण तक्ता तयार करीत आहेत

(2) विद्यार्थी मोठया आवाजात घोषणा करीत आहेत

(3) माहिती भरलेला तक्ता समजून घेत आहे

(4) लघुचित्रपट पाहत आहेत

**133.** वय वाढल्यानंतर विदेशी भाषा शिकणे ——— ठरते

(1) सामान्य शिक्षण

(2) शिकण्यातील अडचण

(3) प्रभुत्वाचा तोटा

(4) मोठे प्रभुत्व

134. ई-लर्निंग काय आहे?

(1) दूरस्थ शिक्षण

(2) माहितीपट

(3) शिकण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर

(4) कार्यकुशलतेने तंत्रज्ञानाचा वापर

135. उद्दिष्टीत (इंग्रजी) भाषेचे शैक्षणिक आणि भाषिक महत्त्व यातील नेमका फरक द्विभाषिक वर्गातील विद्यार्थ्यांना कळावा यासाठी त्यांना कसे प्रोत्साहीत कराल?

(1) उद्दिष्टीत (इंग्रजी) भाषेमधील अधिकाधिक पुस्तके वाचण्यास प्रोत्साहन देऊन

(2) इंग्रजी भाषेत अधिक लिखाण करण्याचे प्रोत्साहन देऊन

(3) द्विभाषिक चित्रपट अधिक पाहण्यासाठी प्रोत्साहन देऊन

(4) उद्दिष्टीत (इंग्रजी) भाषेमध्ये संभाषण करणे

136. भाषेची योग्यता शिकून घेण्यात मागे राहिलेल्या विद्यार्थ्यांना तोलामोलाची मदत करण्यासाठी विकसित केलेल्या अभ्यासक्रमाला काय म्हणाल?

(1) संक्षिप्तीकरण

(2) पुर्नमांडणी

(3) सुधारणा अभ्यासक्रम (Remediation)

(4) उजळणी

137. संमिश्र क्षमता असणाऱ्या भाषा वर्गातील विद्यार्थ्यांसाठी खालीलपैकी कशा प्रकारचा अभ्यासक्रम असावा?

(1) काही काळासाठी एकजिनसी विद्यार्थ्यांचा गट तयार करणारा

(2) वेगवेगळ्या क्षमतांच्या विद्यार्थ्यांमध्ये संवाद साधण्याची संधी देणारा

(3) गणित आणि भाषा विषयाला अधिक महत्त्व देणारा

(4) क्रीडा आणि भाषा विषयावर लक्ष वेधणारा

138. विद्यार्थ्यांसाठी तयार करण्यात आलेल्या क्रमिक पुस्तकात काय असावे. याबाबत अयोग्य गृहितक पर्याय ओळखा

(1) शिकविण्याची क्रमवारी सांगणाऱ्या सूचना असाव्यात

(2) माहितीची मांडणी समतोल असावी

(3) शिकण्याचा अनुभव सांगणारा घटक (युनिट) असावा

(4) विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी शिक्षकांना उपयोगी पडेल असे विस्तृत पाठ नियोजन असावे

139. भाषा शिकताना काही नियमित व्याकरणाच्या चुका टाळण्यासाठी शिक्षकांनी काय करावे.

(1) वर्गात वारंवार चुका दुरुस्त कराव्या जेणेकरुन पुन्हा चुका होणार नाहीत

(2) विद्यार्थ्यांचे वाचन/संभाषण संपल्यावर त्यांच्याकडून नियमित होणाऱ्या चुकांना दुरुस्त करावे

(3) विद्यार्थ्यांना चुका करु द्याव्यात, कारण त्या नैसर्गिक आहेत

(4) चुका करणाऱ्या विद्यार्थ्यांना ओळखून त्यांचा वेगळा वर्ग घ्यावा

**140.** विदेशी (इंग्रजी) भाषा किंवा गैर मातृभाषा शिकविणाऱ्या शिक्षकांना नियमित असंतुष्ट आणि उदासिन विद्यार्थ्यांच्या वर्गाला सामोरी जावे लागते. ही समस्या पुढील प्रमाणे दूर होऊ शकते.

(1) शैक्षणिक समुपदेशकांची वर्गापुढे भाषणे ठेऊन

(2) उदासिन विद्यार्थी ओळखून त्यांचा वेगळा वर्ग घेऊन

(3) विद्यार्थ्यांना त्यांच्या सोयीनुसार गृहपाठ करण्याची मोकळीक देऊन

(4) प्रारूप आणि रणनितीचा वापर करुन वर्गात स्पर्धात्मक वातावरण निर्माण करत विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी प्रेरित करणे

**141.** भाषेचा अभ्यास करणाऱ्यांनी केल्याने होत आहे रे आधी केलेच पाहीजे —— या उक्तीप्रमाणे कार्य करावे. या निरिक्षणाला खालीलपैकी काय समर्थनीय आहे.

(1) लिखित मसुदा समजण्यासाठी मातृभाषेचा वापर करायला प्रोत्साहन देण्यात यावे

(2) लिखित मसुद्याचा ठोस गोषवारा काढून द्यावा

(3) शिक्षकांची छाप; शिक्षकांची बोलण्याची व लिहिण्याची तऱ्हा

(4) सरावाची संधी द्यावी. त्यामुळे सुधारणा करण्याची सवय लागते

***सूचना*** : पुढील उतारा वाचा आणि विचारलेल्या प्रश्नांची योग्य तो पर्याय निवडून उत्तरे लिहा (प्र० क्र० **142** ते **150**) ...

मला आठवते—एकदा आमच्या कॉलेजमध्ये एक कलावंत आला होता. उत्कृष्ट नकला करण्याबद्दल त्याचा लौकिक असल्याचा त्याचा दावा होता. बरोबर त्याने मुंबईच्या मुख्या प्रधानापासून ते नशिराबादच्या हेडमास्तरापर्यंत अनेकांनी दिलेल्या प्रशस्तिपत्रकांचे भेंडोळे आणले होते. त्याने स्वतःच्या गुणांच्या केलेल्या वर्णनावरुन व त्या प्रशस्तिपत्रकांचे भेंडोळे आणले होते. त्याने स्वतःच्या गुणांच्या केलेल्या वर्णनावरुन व त्या प्रशस्तिपत्रकांवरुन आमची तर अशीच खात्री झाली की, जन्माला यावे आणि याच्या नकला पहाव्यात. पैकी जन्माला येण्याचा कार्यभाग अगोदरच उरकला असल्याने फक्त नकला पाहाण्याचा कार्यभाग शिल्लक उरला होता. मोठया अपेक्षेने आम्ही तो कार्यक्रम ठरविला. त्याचा प्रचार केला आणि नंतर काय? त्याने नकलांना सुरुवात केली आणि इकडे प्रत्येकाला जांभया यायला सुरवात झाली! प्राध्यापकवर्ग हजर होता, म्हणूनच बिचारा सुटला—नाही तर पोरांच्या कचाटयात सापडल्यावर त्याचे काय झाले असते हे सांगणे कठीण. आपल्या कलेचे हे बेगडी नाणेच त्याने आमच्या गळी उतरवण्याचा प्रयत्न केला नव्हता काय? त्याचप्रामणे "अखिल भारतात गाजलेला", "सर्व रसिकांनी नावाजलेला", "उत्पन्नाचे रेकॉर्ड मोडणारा", असा "अभिनव क्रांतिकारक" बोलपट पहायला जावे आणि काही तरी बेगडी कलाकृती पडद्यावर दिसून पदरी निराशा यावी असा अनुभव आपणापैकी प्रत्येकाला कितीदा तरी आला असेल. "महाराष्ट्रात खळबळ उडविणारी व आपल्या शैलीने रसिकांच्या मनाची पकड घेणारी" कादंबरी मोठया अपेक्षेन वाचावयास घ्यावी आणि ती अगदी सामान्य निघावी हाही अनुभव आज थोडयांना आला नसेल. "मराठी इब्सेन" म्हणून स्वतःची प्रसिद्धी करुन घेणाऱ्या नाटककाराच्या नाटकात ज्या वेळी इब्सेनच्या बाह्य नाटयतंत्राचीच केवळ भ्रष्ट नक्कल दृष्टीस पडते, तेव्हा तशीच तऱ्हेची निराशा आपल्या वाटयाला येत नाही काय?

अशा तऱ्हेची खोटी नाणी आज समाजात, जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात चालविलेली आपण पाहातो. ''खोटी नाणी'' तयार करणाऱ्याला निदान कायद्याने शिक्षा तरी ठेवली आहे, पण समाजात उजळ माथ्याने चालविली जाणारी वरील ''खोटी नाणी'' कायद्याच्या कक्षेत येऊ न शकल्याने अधिक फसवी आणि अनिष्टकारक आहेत असे वाटत नाही काय? अशी खोटी नाणी चालविणाऱ्या व्यक्तींच्या ठिकाणी असणारे सामाजिक धैर्य आणि बेडर वृत्तीचे मात्र कौतुक करावेसे वाटते. आपले नकली नाणे खऱ्या नाण्याच्या मोलाने खपविण्याचे कौशल्य त्यांच्या ठिकाणी असल्यामुळे एका दृष्टीने खरी नाणी ज्यांच्याजवळ आहेत अशा व्यक्तींवरसुद्धा ते कुरघोडी करु शकतात याचा प्रत्यय तर आपणाला पावलोपावली येतो आणि अशा खोटया नाण्यांवर भुलणारे, खोटयाचाच खरा म्हणून स्वीकार करणारे जगात आहेत म्हणूनच अशा लोकांचे महत्व जगात वाढले आहे. हेही नाकबूल करुन चालावयाचे नाही.

**142.** सोबतच्या उतारा-यामध्ये कशाची चीड व्यक्त केली जाते?

(1) नसलेले गुण दाखविण्याबाबत

(2) जगातील खोटारडेपणाबाबत

(3) जगातिक फसवेगीरीबाबत

(4) खोटी जाहिरात करण्याबाबत

**143.** कुरघोडी करणे म्हणजे काय?

(1) मागे टाकणे

(2) वरचढ होणे

(3) मात करणे

(4) घोडयांनी यशस्वी होणे

**144.** नकला करणे ही कोणती कला आहे?

(1) लोककला

(2) बंडखोर कला

(3) सिनेमातील कला

(4) नाटकातील कला

**145.** गळी उतरविण्याचा प्रयत्न करणे म्हणजे काय?

(1) सर्वांच्या मनाप्रमाणे करणे

(2) ईप्सित साध्य करणे

(3) इंगा दाखविणे

(4) गळयात जबरदस्तीने घालणे

146. प्राध्यापक नसते तर मुलांनी नकलाकाराचे काय केले असते?

(1) त्याला पळवून लावले असते

(2) त्याला शाबासकी दिली असते

(3) त्याचे कपडे फाडले असते

(4) त्याच्यासोबत नकला केल्या असत्या

147. अयोग्य जोडी निवडा

(1) गुरांचा—कळप

(2) प्रशस्तीपत्रांचे—भेंडोळे

(3) माणसांची—वानवा

(4) दुर्वांची—जोडी

148. या उता-यात खोटी नाणी म्हणजे काय?

(1) खोटे कार्यक्रम

(2) खोटी प्रसिध्दी

(3) खोटया नकला

(4) खोटी माणसं

149. बेडर या शब्दाचा अर्थ काय?

(1) धोकादायक

(2) विश्वासघातकी

(3) भीतीदायक

(4) निडर

150. लेखक कोण आहेत?

(1) प्राध्यापक

(2) प्रेक्षक

(3) नकलाकार

(4) टिकाकार

SPACE FOR ROUGH WORK

***खालील सूचना काळजीपूर्वक वाचा :***

1. प्रत्येक प्रश्नासाठी दिलेल्या चार पर्यायांपैकी बरोबर उत्तरासाठी OMR उत्तरपत्रिकेच्या **बाजू-2** वर केवळ एकच वर्तुळ निळ्या किंवा काळ्या बॉलपॉइन्ट पेन ने संपूर्ण निळे/ काळे भरा. एकदा उत्तराचे वर्तुळ भरल्यावर ते बदलता येणार नाही.

2. परीक्षार्थींनी उत्तरपत्रिकेला कोठेही घडी पडणार नाही किंवा त्यावर कुठलीही असंबद्ध खूण केली जाणार नाही याची काळजी घ्यावी. परीक्षार्थींनी आपला अनुक्रमांक उत्तरपत्रिकेत नेमून दिलेल्या जागेव्यतिरिक्त अन्यत्र लिहू नये.

3. चाचणी-पुस्तिका आणि उत्तरपत्रिका काळजीपूर्वक हाताळा. कारण कोणत्याही परिस्थितीत (चाचणी-पुस्तिकेचा कोड अथवा क्रमांक आणि उत्तरपत्रिकेचा कोड अथवा क्रमांक यांमधील विसंगती वगळता) दुसरा संच पुरविला जाणार नाही.

4. चाचणी-पुस्तिका/उत्तरपत्रिका यांवर दिलेला कोड आणि क्रमांक परीक्षार्थींनी उपस्थिती पृष्ठावर बरोबर लिहावा.

5. परीक्षार्थींना कोणतीही पाठ्यपुस्तकांची सामग्री, मुद्रित अथवा लिखित, कागदाचे तुकडे, पेजर, मोबाईल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरण अथवा प्रवेशपत्रिकाव्यतिरिक्त अन्य कोणतीही सामग्री परीक्षेच्या सभागृहात/खोली मध्ये आणण्याची परवानगी नाही.

6. प्रत्येक परीक्षार्थीने त्याची/तिची प्रवेश-पत्रिका पर्यवेक्षकांनी मागितल्यावर त्यांना दाखवली पाहिजे.

7. पर्यवेक्षक अथवा अधीक्षक यांच्या खास परवानगीशिवाय कोणत्याही परीक्षार्थीला आपली जागा सोडता येणार नाही.

8. कामावर असलेल्या पर्यवेक्षकांकडे उत्तरपत्रिका दिल्याखेरीज आणि उपस्थिती पृष्ठावर दोनदा सही केल्या खेरीज परीक्षार्थींनी परीक्षागृह सोडू नये. ज्या परीक्षार्थींनी उपस्थिती पृष्ठावर दुसऱ्यांदा सही केलेली नसेल त्यांची उत्तर-पत्रिका पर्यवेक्षकाकडे दिली गेलेली नाही, असे समजले जाईल आणि ती बाब अनुचित साधनाची बाब मानली जाईल.

9. इलेक्ट्रॉनिक/हस्तसंचालित गणितयंत्रा (Calculator) चा उपयोग निषिद्ध आहे.

10. परीक्षागृहातील वर्तणुकीबाबत परीक्षार्थींना बोर्डाच्या नियमांचे पालन करावे लागेल. अनुचित साधनांच्या सर्व बाबींचा निर्णय बोर्डाच्या नियमांनुसार केला जाईल.

11. चाचणी-पुस्तिका अथवा उत्तरपत्रिका यांचा कोणताही भाग कोणत्याही परिस्थितीत सुटा करू नये.

12. **चाचणी पूर्ण झाल्यानंतर परीक्षार्थींनी उत्तरपत्रिका परीक्षागृहातील पर्यवेक्षकाकडे दिली पाहिजे. चाचणी-पुस्तिका परीक्षार्थी आपल्याबरोबर घेऊन जाऊ शकतात.**

**READ THE FOLLOWING INSTRUCTIONS CAREFULLY :**

1. Out of the four alternatives for each question, only one circle for the correct answer is to be darkened completely with Blue/Black Ballpoint Pen on **Side-2** of the OMR Answer Sheet. The answer once marked is not liable to be changed.
2. The candidates should ensure that the Answer Sheet is not folded. Do not make any stray marks on the Answer Sheet. Do not write your Roll No. anywhere else except in the specified space in the Answer Sheet.
3. Handle the Test Booklet and Answer Sheet with care, as under no circumstances (except for discrepancy in Test Booklet Code or Number and Answer Sheet Code or Number), another set will be provided.
4. The candidates will write the correct Test Booklet Code and Number as given in the Test Booklet/Answer Sheet in the Attendance Sheet.
5. Candidates are not allowed to carry any textual material, printed or written, bits of papers, pager, mobile phone, electronic device or any other material except the Admit Card inside the Examination Hall/Room.
6. Each candidate must show on demand his/her Admit Card to the Invigilator.
7. No candidate, without special permission of the Superintendent or Invigilator, should leave his/her seat.
8. The candidates should not leave the Examination Hall without handing over their Answer Sheet to the Invigilator on duty and sign the Attendance Sheet twice. Cases where a candidate has not signed the Attendance Sheet, a second time will be deemed not to have handed over the Answer Sheet and dealt with as an unfair means case.
9. Use of Electronic/Manual Calculator is prohibited.
10. The candidates are governed by all Rules and Regulations of the Board with regard to their conduct in the Examination Hall. All cases of unfair means will be dealt with as per Rules and Regulations of the Board.
11. No part of the Test Booklet and Answer Sheet shall be detached under any circumstances.
12. **On completion of the test, the candidate must hand over the Answer Sheet to the Invigilator in the Room/Hall. *The candidates are allowed to take away this Test Booklet with them.***

**निम्नलिखित निर्देशों को ध्यान से पढ़ें :**

1. प्रत्येक प्रश्न के लिए दिए गए चार विकल्पों में से सही उत्तर के लिए OMR उत्तर-पत्र के **पृष्ठ-2** पर केवल एक वृत्त को ही पूरी तरह नीले/काले बॉलपॉइंट पेन से भरें। एक बार उत्तर अंकित करने के बाद उसे बदला नहीं जा सकता है।
2. परीक्षार्थी सुनिश्चित करें कि इस उत्तर-पत्र को मोड़ा न जाए एवं उस पर कोई अन्य निशान न लगाएँ। परीक्षार्थी अपना अनुक्रमांक उत्तर-पत्र में निर्धारित स्थान के अतिरिक्त अन्यत्र न लिखें।
3. परीक्षा पुस्तिका एवं उत्तर-पत्र का ध्यानपूर्वक प्रयोग करें, क्योंकि किसी भी परिस्थिति में (केवल परीक्षा पुस्तिका एवं उत्तर-पत्र के संकेत या संख्या में भिन्नता की स्थिति को छोड़कर) दूसरी परीक्षा पुस्तिका उपलब्ध नहीं करायी जाएगी।
4. परीक्षा पुस्तिका/उत्तर-पत्र में दिए गए परीक्षा पुस्तिका संकेत व संख्या को परीक्षार्थी सही तरीके से हाज़िरी-पत्र में लिखें।
5. परीक्षार्थी द्वारा परीक्षा हॉल/कक्ष में प्रवेश-कार्ड के सिवाय किसी प्रकार की पाठ्य-सामग्री, मुद्रित या हस्तलिखित, कागज़ की पर्चियाँ, पेजर, मोबाइल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरण या किसी अन्य प्रकार की सामग्री को ले जाने या उपयोग करने की अनुमति नहीं है।
6. पूछे जाने पर प्रत्येक परीक्षार्थी, निरीक्षक को अपना प्रवेश-कार्ड दिखाएँ।
7. अधीक्षक या निरीक्षक की विशेष अनुमति के बिना कोई परीक्षार्थी अपना स्थान न छोड़ें।
8. कार्यरत निरीक्षक को अपना उत्तर-पत्र दिए बिना एवं हाजिरी-पत्र पर दुबारा हस्ताक्षर किए बिना परीक्षार्थी परीक्षा हॉल नहीं छोड़ेंगे। यदि किसी परीक्षार्थी ने दूसरी बार हाजिरी-पत्र पर हस्ताक्षर नहीं किए, तो यह माना जाएगा कि उसने उत्तर-पत्र नहीं लौटाया है और यह अनुचित साधन का मामला माना जाएगा।
9. इलेक्ट्रॉनिक/हस्तचालित परिकलक का उपयोग वर्जित है।
10. परीक्षा हॉल में आचरण के लिए परीक्षार्थी बोर्ड के सभी नियमों एवं विनियमों द्वारा नियमित हैं। अनुचित साधनों के सभी मामलों का फैसला बोर्ड के नियमों एवं विनियमों के अनुसार होगा।
11. किसी हालत में परीक्षा-पुस्तिका और उत्तर-पत्र का कोई भाग अलग न करें।
12. परीक्षा सम्पन्न होने पर, परीक्षार्थी कक्ष/हॉल छोड़ने से पूर्व उत्तर-पत्र निरीक्षक को अवश्य सौंप दें। ***परीक्षार्थी अपने साथ इस परीक्षा पुस्तिका को ले जा सकते हैं।***